महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ : मा.सं./जनसंपर्क/प्रेस नोट/२७**

# आय.टी.आय. प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्यासाठी महानिर्मितीची सकारात्मक भूमिका

**मुंबई, दि. २९ जुलै, २००९ :-** राज्यातील भारनियमनाची समस्या लक्षात घेऊन विजेच्या टंचाईवर मात करण्यासाठी महानिर्मिती (महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित) तर्फे परळी, पारस, खापरखेडा, भुसावळ, चंद्रपूर तसेच कोराडी येथे मोठ्या प्रमाणावर वीजप्रकल्प उभारणीचे काम सध्या सुरु आहे.

या प्रकल्पांसाठी ज्यांची जमीन संपादित केलेली आहे अशा प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडविण्याबाबत महानिर्मितीने आजवर नेहमीच सकारात्मक भूमिका घेतलेली आहे. परळी येथील एकूण ६०७ वैध प्रकल्पग्रस्तांपैकी ३५४ जणांना आत्तापर्यंत महानिर्मितीच्या सेवेत नियमानुसार सामावून घेण्यात आलेले आहे. उर्वरित पात्र आय.टी.आय. प्रशिक्षित प्रकल्पग्रस्तांना महानिर्मितीच्या सेवेत सामावून घेण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. या संदर्भात महानिर्मिती कळवू इच्छिते की, सदर प्रक्रियेचा एक भाग म्हणून साधारण दि. ८ ऑगस्ट, २००९ पासून आय.टी.आय. प्रशिक्षित प्रकल्पग्रस्तांची ट्रेड टेस्ट (व्यवसाय चाचणी) महानिर्मितीतर्फे प्रस्तावित आहे. महानिर्मिती कंपनीने "कारागीर क" ची १०७६ रिक्त पदे जी भरण्याकरिता जाहिरात यापूर्वी दिलेली आहे त्या जाहिरातीस अनुसरुन आय.टी.आय. प्रशिक्षित प्रकल्पग्रस्तांपैकी पात्र उमेदवारांना सर्वोच्च प्राधान्याने सेवेत सामावून घेण्यात येणार आहे.

यासंदर्भात आणखी उल्लेखनीय बाब म्हणजे मा. उर्जामंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी नुकतेच जाहीर केल्याप्रमाणे, बारावी उत्तीर्ण अथवा दहावी उत्तीर्ण जे प्रकल्पग्रस्त आय.टी.आय प्रशिक्षित नाहीत अशा प्रकल्पग्रस्तांना व मृत कामगारांच्या वारसांना सदर आय.टी.आय. प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या संदर्भात संचालक (आय.टी.आय.) यांच्याशी चर्चा झाली असून त्यांनी अशा प्रकारच्या प्रशिक्षणाच्या आयोजनास सहमती दर्शविली आहे. सध्या अशा एकूण १५१४ बिगर आय.टी.आय. प्रकल्पग्रस्तांना कंपनीसाठी आवश्यक असणाऱ्या दहा ट्रेडमध्ये (जसे तारतंत्री, जोडारी, वीजतंत्री, मेकॅनिकल फिटर, इत्यादि) प्रशिक्षित करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण काळात दरमहा रु. २०००/- इतके विद्यावेतन देण्याची कायमस्वरुपी योजना लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. यापूर्वीच सर्व प्रकल्पग्रस्तांकडून ट्रेडच्या निवडीसाठी विकल्प मागविण्यांत आलेले आहेत. विद्युत केंद्राच्या मुख्य महाव्यवस्थापक यांच्याकडे याबाबत कार्यवाही सुरु आहे. अशा प्रशिक्षित उमेदवारांना टप्याटप्याने महानिर्मितीच्या सेवेत नियमानुसार सामावून घेण्याबाबत कंपनी प्रयत्नशील आहे.

---

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

दिनांक : २९/०७/२००९.

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**